S.N.D.T. Women's University
1, Nathibai Thackersey Road,
New Marine Lines, Churchgate,
MUMBAI - 400 020.
Phone : + 91 22 2203 1879

A- Grade (CGPA 3.08)

श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग, न्यु मरिन लाईन,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.
Website : sndt.ac.in

Ref. No. Affi-Gen/2025-26/ 2996

दिनांक:-19/12/2025

# परिपत्रक

**सर्व संलग्नित व संचालित महाविद्यालयांचे**
**प्राचार्य / प्रभारी प्राचार्य**

**विषय : संलग्नता विभागाशी पत्रव्यवहार करताना पाळावयाच्या मार्गदर्शक सूचना.**

महोदय,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार संलग्नता विभागाचे कार्य हे सदर अधिनियमातील मार्गदर्शक तत्त्वांनुसार तसेच शासन व विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या निर्देशांनुसार करण्यात येते.

तथापि, असे निदर्शनास आले आहे की काही महाविद्यालयांकडून पाठविण्यात येणारी माहिती व कागदपत्रे अपूर्ण, अयोग्य स्वरूपातील अथवा विलंबाने सादर करण्यात येतात. तसेच अनेक वेळा ई-मेलद्वारे सादर करण्यात येणारी कागदपत्रे मोबाईलवरून स्कॅन केलेली, अस्पष्ट, अवाचनीय व जास्त प्रतींमध्ये पाठवली जात असल्यामुळे त्यांची छपाई (**print**) करणे व पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव सादर करणे संलग्नता विभागास शक्य होत नाही.

**याअनुषंगाने, खालील सूचना अत्यंत कडकपणे पाळण्याचे निर्देश देण्यात येत आहेत :**

**1.** संलग्नता विभागास ई-मेलद्वारे कागदपत्रे पाठविल्यानंतर, त्याच कागदपत्रांची एक संपूर्ण हार्ड कॉपी अधिकृत स्वाक्षरीसह अनिवार्यपणे खाली नमूद केलेल्या पत्त्यावर संलग्नता विभागास सादर करावी.

**2.** संलग्नता विभागाशी होणारा सर्व पत्रव्यवहार केवळ खाली नमूद केलेल्या पत्त्यावरच करावा.
अन्य कोणत्याही पत्त्यावर पाठविण्यात आलेला पत्रव्यवहार ग्राह्य धरला जाणार नाही व तो कार्यालयामार्फत परत करण्यात येईल.

**3.** ई-मेलद्वारे सादर करण्यात आलेला अर्ज / कागदपत्रे ही केवळ आगाऊ माहिती (**advance copy**) म्हणून ग्राह्य धरली जातील. अर्जावर पुढील कार्यवाही ही योग्यरीत्या स्वाक्षरी केलेली हार्ड कॉपी प्राप्त झाल्यानंतरच करण्यात येईल.

**4.** स्वाक्षरी करणाऱ्या अधिकृत व्यक्तीचे नाव व पदनाम (**designation**) नमूद नसलेला कोणताही पत्रव्यवहार अवैध समजण्यात येईल व अशा कागदपत्रांवर पुढील कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही.

.N.D.T. Women's University
1, Nathibai Thackersey Road,
New Marine Lines, Churchgate,
MUMBAI - 400 020.
Phone : + 91 22 2203 1879

श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग, न्यु मरिन लाईन,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.
Website : sndt.ac.in

A- Grade (CGPA 3.08)

**पत्रव्यवहारासाठी अधिकृत पत्ता**

**प्रमुख,**
**संलग्नता विभाग,**
**एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ,**
**तिसरा मजला, ॲनेक्स इमारत,**
**१, एन. टी. रोड, चर्चगेट,**
**मुंबई – ४०० ०२०.**

सर्व प्राचार्य / प्रभारी प्राचार्य यांनी वरील सूचनांची गंभीर दखल घ्यावी व त्यांचे काटेकोर पालन करावे. तसेच या सूचनांची माहिती आपल्या महाविद्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यांना देण्यात यावी.

वरील सूचनांचे पालन न झाल्यास प्रस्तावाच्या कार्यवाहीस विलंब होणे अथवा प्रस्ताव नाकारला जाणे यास संलग्नता विभाग जबाबदार राहणार नाही.

## English conversion

Sir/Madam,

As per the provisions of the Maharashtra Public Universities Act, 2016, the Affiliation Section functions strictly in accordance with the guidelines of the Act and the directions issued by the State Government and the University from time to time.

However, it has been observed that information and documents submitted by some colleges are incomplete, improperly presented, or delayed. In several cases, documents received through email are mobile-scanned, unclear, bulky, and unreadable, making it impossible to take printouts or process the proposals further in the Affiliation Section.

**In view of the above, the following instructions are hereby issued and shall be complied with strictly:**

**1.** After sending documents by email to the Affiliation Section, colleges must compulsorily submit one complete hard copy of the same documents, duly signed by the authorized signatory, to the Affiliation Section at the address given below.

**2.** All communications with the Affiliation Section must be addressed only to the address mentioned below. Any correspondence sent to any other address shall not be treated as valid and may be returned without further consideration.

**3.** Applications/documents sent by email shall be treated only as an advance copy for information. Further processing shall be undertaken only after receipt of the hard copy, duly signed and complete in all respects.

**4.** Any communication submitted without proper signature, name, and designation of the authorized signatory shall be treated as invalid and will not be considered for further processing.

**Official Address for Communication**

**Head,**
**Affiliation Section,**
**SNDT Women's University,**
**3rd Floor, Annex Building,**
**1, N. T. Road, Churchgate,**
**Mumbai – 400 020.**

All Principals / In-charge Principals are directed to take serious note of the above instructions and ensure that the same are strictly followed. These instructions should also be brought to the notice of all concerned staff in your college for strict compliance.

Non-compliance with the above instructions may result in delay or non-processing of proposals.

**(Dr. Himmat Jadhav)**
**Dean Faculty of Science and Technology**
Affiliations Section (Addl. Charge)